११/०९/२०१८

प्रेसनोट दिनांक ~~२१/०८/२०१८~~

**सराईत गुंड नामे- अहमद हुसेन पटेल वय ४३ रा.५४/एपी/२११,लोहियानगर,पुणे यास पुणे शहर आयुक्तालय व पुणे जिल्हयातुन एक वर्षासाठी तडीपार**

मा. के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. शिवाजी बोडके, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांनी आगामी गणेश उस्तव काळात कोणताही अनुचीत प्रकार घडु नये व आपले गुन्हेगारी वर्चस्व निर्माण करणारे टोळीचा/गुन्हेगारांचा समुळ नायनाट करण्यासाठी व त्यांचेविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

खडक पोलीस स्टेशन पुणे चा गुन्हे अभिलेखावरील सराईत व अटट्ल गुन्हेगार अहमद हुसेन पटेल वय ४३ रा.५४/एपी/२११,लोहियानगर,पुणे याचेविरुध्द **खडक पोलीस स्टेशन येथे विनयभंगाचे २ गुन्हे, मारामारीचा १ गुन्हा, व घातक शस्त्र बाळगले बाबत १ असे एकुण ४ गुन्हे दाखल आहेत.** तसेच त्याचेविरुध्द सन २००४ मध्ये त्याने कोणत्याही प्रकारे शांतताभंग होईल असे कृत्य करु नये म्हणुन त्यास १ वर्षा करिता पुणे जिल्हयातून तडीपार करण्यात आलेले होते. परंतु त्याचे गुन्हेगारी वागण्यामध्ये काहीही फरक पडलेला नव्हता.

नमुद गुंड नामे- अहमद हुसेन पटेल वय ४३ रा.५४/एपी/२११,लोहियानगर,पुणे याचेविरुध्द वेळोवेळी कारवाई करुनही त्याचे वागणुकीत काहीएक फरक पडलेला नव्हता. तो अत्यंत क्रुर,खुनशी व भांडखोर असुन तो लोकांमध्ये काहीना काही कुरापती काढुन मारहाण करुन गंभीर स्वरुपाचे गुन्हे करीत आहे. त्यांची गुन्हेगारी कृत्ये दिवसेदिवस वाढत असून त्यामुळे सर्वसामान्य, शांतताप्रिय नागरीक व महिलांचे मध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. तो विनाकारण सर्वसामान्य नागरिकांना त्रास देवुन आपला गुन्हेगारी हेतु साध्य करीत होता. त्याने या भागात आपली भयंकर दहशत निर्माण केली होती, त्याचे दहशतीमुळे व भितीपोटी त्याचेविरुध्द तक्रार देण्यास कोणीही पुढे येत नव्हते. त्याचे अशा कृत्यामुळे सर्वसामान्य नागरीकांचे मनात भिती निर्माण होवुन त्यांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण झाला होता. म्हणुन त्यास **पुणे शहर आयुक्तालय व पुणे जिल्हयातुन हददपार करण्या बाबतचा प्रस्ताव खडक पोलीस स्टेशन कडून श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-१ पुणे शहर यांचेकडे पाठवीण्यात आला होता, त्यानुसार त्यांनी अहमद हुसेन पटेल वय ४३ रा.५४/एपी/२११,लोहियानगर,पुणे,यास दिनांक ०८/०९/२०१८ रोजी पासुन पुणे शहर व पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातुन एक वर्षाकरीता तडीपार केलेले आहे.**

अशा प्रकारे आगामी सण व उत्सव काळात कोणताही अनुचीत प्रकार घडु नये या अनुषंगाने पोलीसांकडुन समाजकंटक व अटट्ल गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले असुन त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीसांनी दिले आहेत.

शहर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.प्रदीप आफळे,यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.विजयकुमार शिंदे, सहा.पोलीस निरीक्षक उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी महेश बारवकर, महेश कांबळे, दिपक मोधे यांनी सदर कारवाई मध्ये भाग घेवुन प्रस्ताव तयार केलेला आहे.